# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:04.04.2026** **वारः शनिवार**

---

1. स्वदेशी बनावटीची आयएनएस तारागिरी, ही अत्याधुनिक युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात दाखल
2. इराणच्या नियंत्रणाखालील होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मार्च महिन्यात सर्वाधिक जहाजांची वाहतूक
3. महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यात एक कार विहीरीत कोसळून 9 जण ठार आणि
4. इंडियन प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये पंजाब किंग्सचा चेन्नई सुपर किंग्सवर 5 गडी राखून विजय

**आयएनएस तारगिरी**

स्वदेशी बनावटीची आयएनएस अरिदमन ही अणु पाणबुडी तसंच आयएनएस तारागिरी ही अत्याधुनिक युद्धनौका काल नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत आंध्रप्रदेशच्या विशाखापट्टणम इथे हा नेत्रदीपक सोहळा पार पडला. 'शब्द नाही, शक्ति आहे, अरिदमन!' असं नमूद करत राजनाथ सिंह यांनी या पाणबुडीचा गौरव केला. आयएनएस तारागिरी या अत्याधुनिक युद्धनौकेची बांधणी माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडनं केली आहे. 2047पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी सागरी शक्ती अत्यंत महत्त्वाची आहे; आयएनएस तारागिरी नौदलाच्या ताफ्यात दाखल झाल्यानं, नौदलाची युद्धसज्जता आणि तांत्रिक क्षमता वाढली आहे, असं राजनाथ सिंह यावेळी म्हणाले. सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान, नौदलप्रमुख दिनेश त्रिपाठी आणि व्हाइस ॲडमिरल संजय भल्ला यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी या समारंभाला उपस्थित होते.

**होरमुज प्रवास**

इराणच्या नियंत्रणाखालील होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मार्च महिन्यात एकूण 220 जहाजांनी प्रवास केला, ज्यामध्ये द्रवरूप मालवाहू जहाजांचा वाटा निम्म्याहून अधिक होता. अशी माहिती काल मरीनट्रॅफिक आणि केप्लर यांनी दिली. मरीनट्रॅफिकनं आपल्या समाज मध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे की, यापैकी 111 फेऱ्या या द्रवरूप मालवाहू जहाजांनी केल्या त्यानंतर 82 कोरड्या मालाची वाहतूक करणारी जहाजं आणि 27 एलपीजी वाहक जहाजं होती. या महिन्यात एल एनजि चि एकही फेरी नोंदवली गेली नाही असं या अकडेवारितून दिसून आलं. या सामरिक जलमार्गातून होणारी वाहतूक आखातातून पश्चिमेकडून पूर्वेकडे होणाऱ्या हालचालींकडे मोठ्या प्रमाणात झुकलेली होती. ज्यांची एकूण संख्या 149 होती, म्हणजेच या आखातात पूर्वेकडून पश्चिमेकडे होणाऱ्या महिन्यातील सरासरी 68 टक्के फेऱ्यानमध्ये वाढ होऊन या महिन्यात त्यांच्या संख्येत 71 टक्के वाढ नोंदवण्यात आली.

**होर्मुज मतदान**

होर्मुजच्या सामुद्रधुनीतील जहाज वाहतूकीच्या सुरक्षेसाठी संरक्षण दलाचा अधिकृत वापर करण्याच्या प्रस्तावावर घेण्यात येणाऱ्या मतदानाला संयुक्त राष्ट्राच्या संरक्षण परिषदेनं स्थगिती दिली आहे.15 सदस्यांच्या या परिषदेत बहारीनच्या प्रस्तावाच्या मसुदयावर मतदान घेण्यात येणार होते. मात्र गुड फ्रायडेच्या सुट्टीमुळे नियोजित कार्यक्रमात बदल करण्यात आला आहे. या महिन्यात बहारीन संयुक्त राष्ट्रांच्या संरक्षण परिषदेचं अध्यक्षपद भूषवित आहे.

**इराण-अणुऊर्जा हल्ले**

इराणच्या अणुऊर्जा संघटनेने आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेवर देशाच्या अणुऊर्जा पायाभूत सुविधांवरील लष्करी हल्ल्यांचा निषेध न केल्याबद्दल यामध्ये स्पष्ट सहभागाचा आरोप केला असल्याचं वृत्त इराणच्या सरकारी वृत्त वाहिनीनं दिलं आहे. इराणी संघटनेनं असा दावा केला आहे की, अलीकडच्या काळातील अमेरिका-इस्रायल संघर्षावर जागतिक देखरेख संस्थेनं मौन बाळगलं असून ही संस्था प्रभावीपणे हल्लेखोरांच्या बाजूने उभी आहे. समाज मध्यमावरील एका निवेदनात एईओआयने खुलासा केला की त्यांचे प्रमुख, मोहम्मद इस्लामी यांनी आयएईएचे महासंचालक राफेल ग्रोसी यांच्याशी वारंवार संपर्क साधला आहे. महासंचालकांना शांततापूर्ण ऊर्जा

उत्पादनासाठी समर्पित असलेल्या इराणी स्थळांना लक्ष्य करणाऱ्या "बेकायदेशीर हल्ल्यांचा" महासंचालकांनी औपचारिकपणे निषेध करावा असं आवाहन इस्लामिंनी पत्रव्यवहाराद्वारे केलं आहे.

**इटली पंतप्रधान सौदी**

इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी काल जेद्दाह येथे अघोषित दौऱ्यावर आगमन झाल्यावर सौदीचे युवराज मोहम्मद बिन सलमान यांची भेट घेतली. सौदी च्या वृत्त वाहिनीने दिलेल्या माहितीनुसार, या बैठकीत त्यांनी द्विपक्षीय संबंध आणि पुढील विकासाच्या संधींचा आढावा घेतला. तसंच, त्यांनी ताज्या प्रादेशिक घडामोडी, सध्या सुरू असलेल्या लष्करी संघर्षाचे आंतरराष्ट्रीय सागरी वाहतूक आणि ऊर्जा सुरक्षेवरील परिणाम, जागतिक अर्थव्यवस्थेवरील त्याचा प्रभाव आणि प्रादेशिक सुरक्षा आणि स्थिरता वाढवण्यासाठी संयुक्त प्रयत्नांच्या समन्वयावरही त्यांनी चर्चा केली. आखाती प्रदेशातील काही भागांमध्ये इराणने केलेल्या हल्ल्यांनंतर वाढलेला प्रादेशिक तणाव आणि ऊर्जा सुरक्षेबाबतच्या वाढत्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर त्यांचा हा दौरा होत आहे.

**सचिव दौरा**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव म्हणून चंचल कुमार यांनी नुकताच पदभार स्वीकारला. चंचल कुमार आज पुणे दौऱ्यावर असून, ते भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था, आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला भेट देणार आहेत. या दोन्ही संस्थांच्या, तसंच आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या अधिकाऱ्यांसमवेत ते बैठकही घेणार आहेत.

**महा. साधना सप्ताह**

महाराष्ट्रानं महा-साधना सप्ताह चा एक भाग म्हणूंन मिशन कर्मयोगी अंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांसाठी क्षमता बांधणीची एक व्यापक मोहीम सुरू केली आहे. प्रशासनातील कार्यक्षमता आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता वाढवण्यासाठी अधिकारी कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा अनालिटिक्स,ब्लॉकचेन आणि संवाद कौशल्य यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये विशेष प्रशिक्षण घेत आहेत. या उपक्रमांतर्गत, 32 विभागांमधील 8 लाखांहून अधिक कर्मचारी सहभागी होणार आहेत; तसच 'iGOT कर्मयोगी' या मंचावरील 50 विशेष अभ्यासक्रमांच्या माध्यमातून एकूण 35 लाख 'अध्ययन तास' पूर्ण करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

**हबशान गॅस प्रकल्प अपघात**

हवाई संरक्षण कारवाईमुळे पडलेल्या ढिगाऱ्यामुळे अबू धाबीमधील हबशान गॅस प्रकल्पात काल दोन ठिकाणी आग लागल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाला आणि चार जण जखमी झाले. वाढत्या प्रादेशिक तणावाच्या पार्श्वभूमीवर ही घटना घडली, ज्यामध्ये हवाई संरक्षण यंत्रणांनी याआधी येणारी क्षेपणास्त्रे रोखली होती. हबशान गॅस प्रक्रिया संकुल हे संयुक्त अरब अमिरातीमधील सर्वात मोठ्या आणि अत्यंत मोक्याच्या ऊर्जा सुविधांपैकी एक असून, त्याचे संचालन अबू धाबी राष्ट्रीय तेल कंपनीद्वारे केले जाते. संपूर्ण संयुक्त अरब अमिरातीमध्ये वीज निर्मिती, क्षारविरहितीकरण आणि औद्योगिक कार्यांमध्ये हा प्रकल्प महत्त्वपूर्ण योगदान देतो.

**रायगड**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त काल त्यांना महाराष्ट्रासह देशभरातून आदरांजली अर्पण करण्यात आली. केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी शिवरायांना अभिवादन केलं. शिवाजी महाराजांनी धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी लोकांना संघटित करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, असं शहा यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. दुर्गदुर्गेश्वर रायगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 346 व्या पुण्यतिथी दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. खासदार आणि भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी यावेळी आपले विचार मांडले. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले किल्ले आपल्या संस्कृतीचे चैतन्यमय तीर्थाटन आहेत, असं प्रतिपादन त्रिवेदी यांनी केलं. मुख्य कार्यक्रमानंतर शिवरायांच्या पालखीची मिरवणूक सिंहासनापासून समाधीस्थानी काढण्यात आली. तिथे रायगड पोलिसांतर्फे बंदुकीच्या फैरी झाडून आणि घोषाचे वादन करून शिवरायांना मानवंदना देण्यात आली. महाराजांची समाधी, जगदीश्वर मंदिर तसेच सिंहासनावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली.

**गुडफ्रायडे**

गुडफ्रायडे निमित्त काल राज्यभर येशू ख्रिस्तांचं स्मरण करण्यात आलं. विविध चर्चमध्ये या निमित्त विशेष प्रार्थना करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने ख्रिस्ती बांधव एकत्र जमले होते. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुड फ्रायडे निमित्त येशू ख्रिस्ताना अभिवादन केलं.

**नाशिक अपघात**

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी इथं कार विहिरीत कोसळल्यानं एकाच कुटुंबातील 9 जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये 5 विद्यार्थ्यांचा समावेश आहे. एका खासगी शिकवणी वर्गाचं स्नेहसंमेलन आटोपून निघत असताना मंगल कार्यालयाजवळच असलेल्या शेतातील विहिरीत कार कोसळली.

**आयपीएल**

इंडियन प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये काल रात्री पंजाब किंग्सनं चेन्नई सुपर किंग्सचा 5 गडी राखून पराभव केला. विजयासाठी आवश्यक असलेल्या 209 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, पंजाब किंग्सने 18 षटकं आणि 5 चेंडूत पाच गडी गमावून 210 धावा केल्या. पंजाब किंग्स कडून श्रेयस अय्यर 50 धावा करत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला तर प्रभसीमरन सिंगनं महत्वपूर्ण 43 धावांचं योगदान दिलं. प्रियांश आर्याला सामनावीर म्हणूंन घोषित करण्यात आलं. प्रथम फलंदाजी करताना, चेन्नई सुपर किंग्सने निर्धारित 20 षटकांत पाच गडी गमावून 209 धावा उभारल्या. आयुष म्हात्रे 73 धावांसह संघाचा सर्वोच्च धावसंख्या करणारा फलंदाज ठरला, तर शिवम दुबेने नाबाद 45 धावा केल्या.

**फुटबॉल**

पुरुषांच्या 20 वर्षाखालील गटाच्या सॅफ चॅम्पियनशिप स्पर्धेत काल बांग्लादेशने भारताचा 3-0 असा पराभव करत विजयाची मोहोर उमटवली. बांग्लादेशने दुसऱ्यांदा ही स्पर्धा जिंकली आहे. स्पर्धेत सुरुवातीला भारताने आपल्या पाकिस्तानवर तीन शून्य असा विजय मिळवला. तर बांगलादेशविरुद्ध झालेला पहिलं सामना एक-एक असा बरोबरीत सुटला होता. त्यानंतर, अंतिम चारमध्ये भारतीय संघानं भूटानचा 5-0 असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.